


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक १२३, बुधवार ९ एप्रिल २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# पारनेर बाजार समितीला विक्रमी ४ कोटींचे उत्पन्न

## ■ २ कोटींचा नफा ■ ३ कोटींच्या ठेवी ■ सभापती, उपसभापतींची माहिती

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर तालुका कृषि उत्पन्न बाजार समितीस ३१ मार्च रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात विक्रमी ४ कोटी २६ लाख ४० हजार ८७४ रूपयांचे उत्पन्न झाले असून खर्च वजा जाता २ कोटी ८ लाख ९२ हजार ४१५ रूपयांचा विक्रमी नफा झाला आहे.**

दरम्यान संस्थेने राष्ट्रीयकृत बँकेमध्ये ३ कोटी ९ लाख ६० हजार रूपयांची मुदत ठेव ठेवली असल्याची माहिती सभापती किसनराव रासकर व उपसभापती किसनराव सुपेकर यांनी दिली.

पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांची कामधेनू असलेल्या बाजार समितीचा कारभार पारदर्शीपणे करण्यात येत असून काटकसरीचे धोरण अवलंबिल्याने संस्थेच्या नफ्यामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. गेल्या आर्थिक वर्षात संस्थेला मिळालेले उत्पन्न हे आजवरच्या इतिहासाच्या तुलनेत सर्वाधिक असून यापुढील काळात हे उत्पन्न कसे वाढेल याकडे संचालक मंडळ प्रयत्नशिल असणार असल्याचे रासकर व सुपेकर यांनी सांगितले.



### कौतुकास्पद कामगिरी

पारनेर बाजार समितीचे पदाधिकारी तसेच संचालक मंडळ शेतकरी हितासबोतच संस्थेचेही हित जोपासत असल्याचे कागदोपत्री सिद्ध झाले आहे. संचालक मंडळाने यापूढील काळातही असाच पारदर्शक कारभार करून आदर्श निर्माण करावा.

खासदार नीलेश लंके.
लोकसभा सदस्य

### विश्वासार्हतेची जपणूक

पारनेर तालुक्यातील कांदा हा निर्यातक्षम आहे. विशेषतः आखाती देशांमध्ये या कांद्याला मोठी मागणी असते. त्यामुळे कांदा निर्यातदार पारनेर बाजार समितीमध्ये कांदा खरेदी करतात. परिणामी राज्यातील इतर बाजार समितीच्या तुलनेमध्ये शेतकऱ्यांना दोन पैसे अधिक भाव मिळतो. कांदा विक्रीनंतर व्यापारीही शेतकऱ्यांना तात्काळ कांदा विक्रीचे पैसे वर्ग करतात. त्यामुळे शेतकरी बांधव विश्वासाने पारनेर बाजार समितीमध्ये कांदा विक्रीसाठी आणतात.

### शेतकऱ्याला ऑनलाईन काटा पट्टी

शेतकऱ्याचा शेतमाल बाजार समितीच्या आवारात आल्यानंतर लगेच मालाचे वजन करणारी पारनेर बाजार समिती ही राज्यातील पहिली बाजार समिती आहे. मालाच्या वजनाची काटा पट्टी वजन झाल्यानंतर शेतक-याच्या मोबाईलवर तात्काळ मिळण्याची सुविधा लवकरच उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी बाजार समितीच्या वतीने एक सॉफ्टवेअर खरेदी करण्यात आले असून त्याचे प्रशिक्षण सध्या सुरू आहे. पुढील महिन्यापासून ऑनलाईन काटापट्टी शेतकऱ्याच्या मोबाईलवर मिळण्यास सुरूवात होईल.

सुरेश आढाव, सचिव

### पेट्रोल पंप कायम नफ्यात

सन २००९ पासून भाळवणी उपबाजार येथे बाजार समितीच्या वतीने पेट्रोल पंप चालविण्यात येत आहे. या पंपावर गुणवत्तेची हमी असल्याने ग्राहकांकडून या पंपास पसंती दिली जाते. पंप सुरू झाल्यापासून बाजार समितीस दरवर्षी ३० ते ४० लाख रूपयांचे उत्पन्न मिळते.

### सुप्यात ग्रेडींगची व्यवस्था

बाजार समितीने सुपा औद्योगिक वसाहतीमध्ये १ हजार मेट्रीक टन क्षमतेचे गोदाम उभारले असून त्यात धान्य चाळणी यंत्र बसविण्यात येऊन धान्याच्या ग्रेडींगची व्यवस्था करण्यात आली आहे. या गोदामासाठी नुकतीच वीजेची जोडणी मिळाली असून ग्रेडींगची सुविधाही शेतकरी बांधवांसाठी उपलब्ध होणार आहे.

### सोयाबीन खरेदी

बाजार समितीच्या वतीने शासनाच्या आधारभुत किमतीने शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी करण्यात आले असून खरेदी करण्यात आलेल्या सर्व शेतकऱ्यांच्या सोयाबीनचे पैसे खात्यावर थेट जमा झाले आहेत.

### मुदत ठेवी

नगर बाजार समितीमधून विभक्त झाल्यानंतर एका छोटया खोलीतून सुरू झालेला पारनेर बाजार समितीचा कारभार गेल्या काही वर्षात मोठया प्रमाणावर विस्तारला आहे. संस्थेचे उत्पन्न वाढल्याने संस्थेला मिळालेल्या नफ्यातून गेल्या दोन वर्षात संस्थेने राष्ट्रीयकृत बँकेत ३ कोटी ९ लाख ६० हजार रूपयांच्या मुदत ठेवी ठेवल्या आहेत.

### बाजार समितीच्या मानांकनात वाढ

पारनेर बाजार समिती पुर्वी अ मानांकनात होती. यंदा उत्पन्न वाढल्याने २.५ कोटी ते ५ कोटी उत्पन्न असणाऱ्या बाजार समित्यांसाठीच्या ऐ टू स्टार मानांकनाच्या पंगतीमध्ये पारनेर बाजार समिती जाऊन बसली आहे.

### अस्थापना खर्चामध्ये बचत

बाजार समितीला मिळालेल्या उत्पन्नाच्या ५० टक्के खर्च कर्मचारी अस्थापनेवर खर्च करण्याची मुभा आहे. मात्र कर्मचारी अस्थापना खर्चात बचत करण्यात येऊन हा खर्च केवळ ७३ लाख इतका झाला आहे.

### सन २०२४-२५ ची उलाढाल

एकूण उत्पन्न ४ कोटी २६ लाख ४० हजार ८७४, खर्च २ कोटी १७ लाख ४८ हजार ४५९, नफा २ कोटी ८ लाख ९२ हजार ४१५, आवक १५ लाख ३० हजार २७७ क्विंटल कांदा, १० हजार ४७० क्विंटल सोयाबीन, उलाढाल ४२६कोटी.

### कमी जागेत जास्त उत्पन्न

पारनेर बाजार समितीच्या मुख्य बाजारासाठी केवळ ४ एकर १५ गुंठे इतकी जागा आहे.जिल्हयात मुख्य बाजारासाठीची सर्वात कमी जागा असणारी ही बाजार समिती आहे. कमी जागेत जास्त उत्पन्न मिळविण्याची किमया बाजार समितीचे संचालक मंडळ तसेच कर्मचारी वर्गाने केली आहे.

### सन २०२२-२३ची उलाढाल

एकूण उत्पन्न : १ कोटी ७७ लाख ९ हजार ११६, खर्च : १ कोटी ४९ लाख १४ हजार ४१३, नफा २७ लाख ९४ हजार ७०३, आवक ११ लाख ९० हजार ३६ क्विंटल. उलाढाल १७७ कोटी

### सन २०२३-२४ ची उलाढाल

एकूण उत्पन्न ३ कोटी १९ लाख ३० हजार ३५२, खर्च १ कोटी ८५ लाख ६९ हजार ९२६, नफा १ कोटी ३३ लाख ६० हजार ४२६, आवक १७ लाख १४ हजार ७ क्विंटल, उलाढाल ३१९ कोटी.

# माजी आ.अरुणकाकांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना

## पुणे येथे खासगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार



अहिल्यानगर : प्रतिनिधी

**माजी आमदार अरुण जगताप यांच्यावर पुणे येथे खासगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार चालू आहेत. माजी सैनिक त्रिदल संघटनेच्या वतीने तसेच सेवानिवृत्त पोलिस संघटनेच्या वतीने संभाजीनगर रोडवरील डीएसपी चौकातील हुसेन शहा बाबा दर्गा येथे गलेफ व चादर अर्पण करून शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिरात जाऊन गणेशचरणी त्यांच्या उत्तम प्रकृती व दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करण्यात आली.**

याप्रसंगी त्रिदल संघटनेचे अध्यक्ष बाळासाहेब आंधळे, सेवानिवृत्त पोलिस संघटनेचे अध्यक्ष जमाल शेख, राज्याचे आरोग्य अध्यक्ष युनूस ठेंगे, उपाध्यक्ष हरिभाऊ चिरके ,दिलावर इनामदार, राजमोहम्मद शेख, अकबर शेख, संजय साठे, दिलावर पठाण, संदीप काकडे, जयकुमार कुट्टी, कॅप्टन मनोहर उबाळे, सुभेदार विनायक मोराळे आदी उपस्थित होते.

त्रिदल संघटनेचे अध्यक्ष आंधळे म्हणाले, माजी आमदार जगताप यांच्या प्रकृतीसाठी व त्यांना दीर्घायुष्यासाठी शहरातील हुसेन शहा बाबा दर्गा येथे गलेफ, चादर अर्पण करून तसेच शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे जाऊन त्यांच्यासाठी प्रार्थना केली.

# अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर लाडकी बहीण योजनेचा हप्ता !

## महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांची माहिती । लाभार्थींची संख्या घटणार की वाढणार?



मुंबई : प्रतिनिधी

**राज्य सर्वात लोकप्रिय ठरलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा हप्ता अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर महिलांच्या खात्याचा जमा होणार आहे. विशेष म्हणजे यंदा लाभार्थींची संख्या घटणार की वाढणार असा प्रश्न उपस्थित होत असतानाच आता एप्रिलचा हप्ता जमा होणार असल्याची माहिती समोर आली आहे. या संदर्भात महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी माहिती दिली आहे.**

विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य सरकारच्या वतीने महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना घोषित करण्यात आली होती. या योजनेला महाराष्ट्रातील महिलांकडून मोठ्या प्रमाणात पसंती मिळाली. त्यामुळे ही योजना महाराष्ट्र सर्वाधिक लोकप्रिय योजना ठरली आहे. या योजने नंतर राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार स्थापन झाले आहे. मात्र निवडणुकीच्या काळात महिलांना २१०० रुपये या योजनेच्या माध्यमातून देण्याचे आश्वासन महायुती कडून अद्याप पूर्ण करण्यात आलेले नाही. असे असले तरी दरमहा पंधराशे रुपयांचा हप्ता महिलांच्या खात्यात जमा होत आहे. एप्रिल महिन्याचे पैसे देखील आता महिलांच्या खात्यात जमा होणार असून उर्वरीत पान ३ वर

# दौलताबादच्या देवगिरी किल्ला परिसरात भीषण आग

## किल्ल्याच्या चहूबाजूने धुराचे लोट । अग्निशमन दल घटनास्थळी दाखल

छ.संभाजीनगर : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर येथील दौलताबाद इथल्या ऐतिहासिक देवगिरी किल्ल्यावर आग लागल्याची माहिती समोर आली आहे. ही आग दौलताबाद किल्ल्याच्या चारही बाजूंनी लागली. देवगिरी किल्ला तसेच जवळच असलेल्या खंदूर्णी परिसरात मंगळवारी सकाळच्या सुमारास ही आग लागली. ही आग पसरत गेल्याने



किल्ल्याच्या चारही बाजूने आगीने विळखा घातला असल्याचे दिसते. या आगीत किल्ला परिसरात वास्तव्यास उर्वरीत पान ३ वर

# आमदार निवासात भाजप कार्यकर्त्याचा मृत्यू

## रुग्णवाहिका वेळेत न मिळाल्याचा अंदाज

मुंबई: प्रतिनिधी

**दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या हलगर्जीपणामुळे तनिषा भिसे यांचा मृत्यू झाला हे प्रकरण ऐरणीवर असतानाच अजून एक धक्कादायक प्रकार समोर येत आहे. आमदार निवासातून वारंवार फोन जाऊनही रुग्णवाहिका उपलब्ध झाली नाही. त्यामुळे चंद्रकांत धोत्रे यांचे निधन झाल्याची माहिती समोर येत आहे. त्यांना हृदयविकाराच्या तीव्र वेदना होत होत्या. मात्र वेळीच उपचार उपलब्ध न झाल्याने त्यांचा मृत्यू झाला.**




मंत्रालयाच्या जवळ आकाशवाणी येथील आमदार निवासातील रुम नं ४०८ ही आमदार विजय देशमुख यांची खोली होती. तेथे मुंबईत कामानिमित्त आलेले चंद्रकांत धोत्रे वास्तव्यास होते. उर्वरीत पान ३ वर

# उदंड झाली खाती, पण अधिकार किती?

## अर्धा डझन मंत्र्यांची नाराजी । मुख्यमंत्री फडणवीसांकडे तक्रार करणार

मुंबई: प्रतिनिधी

**महायुती सरकारमधील राज्यमंत्री नाराज आहेत. उदंड झाली खाती, पण त्या खात्यांमध्ये अधिकार नेमके किती, अशी राज्यमंत्र्यांची अवस्था आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात ६ राज्यमंत्री आहेत. प्रत्येकाकडे ६ खाती आहेत. पण त्यांना कॅबिनेट मंत्र्यांनी अधिकार दिलेले नाहीत. त्यामुळे राज्यमंत्रिपद केवळ शोभेपुरते आणि दाखवण्याकरता असल्याची भावना राज्यमंत्र्यांच्या कार्यालयांमध्ये व्यक्त होत आहे.**

राज्यमंत्र्यांचाही सन्मान राखला जाईल अशा पद्धतीने त्यांना अधिकार प्रदान करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या होत्या. कॅबिनेट मंत्र्यांनी राज्यमंत्र्यांना अधिकार न दिल्यास, मीच राज्यमंत्र्यांना अधिकार बहाल करेन, असेही फडणवीस म्हणाले होते. त्यानुसार काही कॅबिनेट मंत्र्यांनी राज्यमंत्र्यांना कोणकोणते अधिकार दिले याचे परिपत्रक काढले. त्यातून राज्यमंत्र्यांना अतिशय किरकोळ अधिकार देण्यात आल्याचं स्पष्ट झाले.

आधी राज्यमंत्र्यांना ते ज्या विभागातून येतात, त्यापुरते अधिकचे अधिकार दिले जायचे. तशी पद्धत यावेळी आला असती, तर राज्यमंत्र्यांना



किमान त्यांचा मतदारसंघ ज्या महसूल विभागात येतो, त्यापुरते तरी जास्तीचे अधिकार मिळाले असते. काही कॅबिनेट मंत्र्यांनी तर उच्च कोटीचा कंजूषपणा केला आहे. त्यांनी राज्यमंत्र्यांना ज्या विषयाचे अधिकार दिले, त्याबद्दल निर्णय घेण्यासाठी फाईल आपल्याकडेच येईल, असे आदेश काही कॅबिनेट मंत्र्यांनी काढले आहेत.

मुख्यमंत्र्यांनी त्यांच्याकडे असलेल्या खात्यांच्या राज्यमंत्र्यांना अन्य कोणत्याही कॅबिनेट मंत्र्यांपेक्षा जास्त अधिकार दिले आहेत. पण कॅबिनेट मंत्री मनाचा तेवढा मोठेपणा दाखवण्यास तयार नाहीत. त्यामुळे काही राज्यमंत्री याबद्दल मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करणार असल्याची माहिती आहे

आशिष जयस्वाल, योगेश कदम, पंकज भोयर, इंद्रनील नाईक, मेघना बोर्डिकर, माधुरी मिसाळ असे सहा राज्यमंत्री आहेत. विशेष म्हणजे हे मंत्री ज्या पक्षांचे आहेत, त्या पक्षाच्या कॅबिनेट मंत्र्यांनीही त्यांना अधिकार देण्याचं औदार्य दाखवलेले नाही. आपल्यावर होत असलेल्या अन्यायाबद्दल कोणतेही राज्यमंत्री जाहीरपणे उर्वरीत पान ३ वर



फॅशन|संसार|सौंदर्य

# सखी

# ‘टर्टल नेक’ फॅशन

**थोडीशी थंडी सुरू होताच फॅशनप्रेमी युवती, महिला खास हिवाळ्यात घालण्यासाठीचे कपडे आणि ॲक्सेसरीज् कधी आणि कशा वापरता येतील याचा विचार करून ठेवतात. अशीच आवर्जून हिवाळ्यात घातल्या जाणाऱ्या टी-शर्ट किंवा स्वेटरची फॅशन म्हणजे ‘टर्टल नेक’.**




या फॅशनला ‘टर्टल नेक’ का म्हणतात याचं उत्तरही त्याच्या नावातच आहे. गळ्यापाशी पुंगळीसारखी रचना असलेल्या- अर्थात ‘ट्युब्युलर नेकलाईन’ची दोन नावं तुम्ही कदाचित ऐकली असतील. ‘पोलो नेक’ आणि ‘टर्टल नेक’. मजा म्हणजे या दोन्ही फॅशन्स साधारण एकसारख्याच असतात. अमेरिकेत त्याला ‘टर्टल नेक’ म्हणतात, तर युनायटेड किंग्डममध्ये ‘पोलो नेक’ (इथे ‘पोलो नेक’ ही गळ्याची फॅशन आणि ‘पोलो शर्ट’ हा टी-शर्ट या फॅशन्सची गल्लत करू नका बरं! कारण त्या दोन्हीत मात्र काहीच साम्य नाही.) आपल्याकडे ट्युब्युलर नेकलाईनसाठी टर्टल नेक हेच नाव आता रूढ झालं आहे. या फॅशनमध्ये गळा आणि मान झाकली जात असल्यानं कासवानं मान कवचाच्या आत घ्यावी आणि बाहेर काढावी, ती उपमा त्याला देण्यात आली आहे.

## मटेरियल

सर्वसाधारणपणे टर्टल नेक हे स्वेटरच्या कापडात म्हणजे वूलन, विणलेल्या कापडात पुलोव्हर प्रकारात मिळतात. परंतु आपल्याला थंडीत प्रत्येक वेळी स्वेटरची गरज भासेलच असं नाही, त्यामुळे थोड्याशा थंडीत वापरायची असेल तर पॉलिस्टरच्या, लांब बाह्यांच्या टर्टलनेक पुलोव्हर टी-शर्टच्या रूपात ही फॅशन परिधान करता येते. हे पॉलिस्टरचं मटेरिअल वूलन फील देणारं, काहीसं उबदार आणि ‘रिब्ड टेक्स्चर’ असलेलं असतं.

## अशी करता येईल टर्टल नेकची फॅशन

संध्याकाळी किंवा रात्री फिरायला जाताना, प्रवास करताना टर्टल नेक टी-शर्ट किंवा स्वेटर छान मिरवता येतात. हल्ली स्लीव्हलेस टर्टल नेक टी-शर्ट्स आणि स्लीव्हलेस टर्टल नेक क्रॉपटॉप्सचीही चलती दिसते आहे. स्लीव्हलेस असल्यानं त्यांचा थंडीच्या दृष्टीनं काही उपयोग होत नाही, परंतु ते ‘यंग’ आणि ‘कॅज्युअल’ लूक देत असल्यानं मुलींची त्यांना पसंती दिसते. लांब बाह्यांचे टर्टल नेक टी-शर्ट वा स्वेटर साध्या जीन्सवर छान दिसतातच, पण आणखी काही पद्धतीनं त्यांची फॅशन करायची असेल, तर त्याबद्दल वेगवेगळ्या फॅशनतज्ज्ञांनी काय सांगून ठेवलंय, ते पाहू या...



- ऑफिसवेअरसाठी : ट्राऊझर आणि त्याला सूट होणारं फॉर्मल जॅकेट किंवा ब्लेझर याबरोबर टर्टल नेक टी-शर्ट खूप छान दिसतो. हल्ली अनेक क्षेत्रांमध्ये ऑफिसेसमध्ये कायम ‘फॉर्मल’च कपडे वापरायला हवेत असा नियम नसतो. तिथे डेनिमचे कपडेही वापरले जातात. अशा वेळी रोजच्या जीन्सबरोबर टर्टल नेक टी-शर्ट घालून त्यावर डेनिमचं किंवा इतर कुठलंही कम्फर्टेबल जॅकेट घालून लूक पूर्ण करता येईल.
- ‘कॅज्युअल वेअर’साठी : गुडघ्यापर्यंतच्या किंवा मिडी वा मिनी स्कर्टवरही टर्टल नेक छान दिसतो. यात स्कर्ट जर ‘फ्लेअर्ड’ प्रकारचा असेल, तर वरचा टर्टल नेक अंगाबरोबर बसणारा असावा, असं बहुतेक फॅशनतज्ज्ञ सुचवतात. स्कर्ट घट्ट फिटिंगचा किंवा अंगाबरोबर बसणारा म्हणजे ‘ए-लाईन’ किंवा ‘पेन्सिल’ स्कर्ट असेल, तर टर्टल नेक थोडा ‘ओव्हरसाईज्ड’ म्हणजे घोळदार चांगला दिसेल, असं सांगितलं जातं. जीन्सवर टर्टल नेक टी-शर्ट ‘इन’ करून त्यावर थंडीसाठीचा ओव्हरसाईज्ड कोट घालणंही फॅशनमध्ये आहे. टर्टल नेकची थोडी ‘अनयूज्वल’ अशी फॅशन हल्ली दिसते, त्यात जीन्सवर टर्टलनेक घालून त्यावर आणखी एक पूर्ण बाह्यांचा, कॉलरचा कॉटन शर्ट घातलेला असतो. यात टर्टल नेकचा केवळ नेकच वर घातलेल्या शर्टमधून दिसून येतो. ही फॅशन ऐकायला जरा विचित्र वाटली, तरी ती काही सेलिब्रिटी लोकांकडून केलेली बघायला मिळाली आहे. कदाचित परदेशातल्या अती थंडीवरचा हा फॅशनेबल उपाय असावा.

# कुडकुडीत फॅशन

**फॅशन इंडस्ट्री ही अथांग आहे. त्याला आजच्या काळात कसलीही सीमा, परिसीमा राहिलेली नाही. दिवसागणिक, ऋतुगणिक, माणसागणिक फॅशन बदलत राहते. याचे मूळ कारण आजची तरुण पिढी. त्यांच्यासाठी आणि त्यांच्या मते प्रत्येक क्षणाची फॅशन वेगळी असू शकते. हिवाळा म्हटलं की फॅशनचं परिमाण पूर्णपणे बदलतं, पण हिवाळ्यातील फॅशन सगळ्यात स्मार्ट दिसते अशी आजच्या तरुणाईची धारणा आहे. हिवाळ्यातील फॅशन ट्रेण्ड्सचा घेतलेला हा आढावा**

## डेनिम जॅकेट्स

हिवाळ्यात जरा लूज कपडे घालायला तरुणाईला आवडतं. डेनिम जॅकेट्स हा या मौसमातील सगळ्यात ट्रेण्डी प्रकार आहे. ते घातल्यावर अतिशय स्मार्ट लूक येतो. हिवाळ्यात कॅज्यूअल कपड्यांबरोबर डेनिम जॅकेट परिधान केलं जाऊ शकतं. डेनिम जॅकेट हे ट्रेण्डी वुलन क्रॉप टॉप तसंच टी शर्टबरोबर ट्राय करता येतं. तुम्हाला हव्या त्या साईजमध्ये डेनिम जॅकेट्स मिळू शकतात. शॉर्ट, लॉन्ग, हाफ, फुल, स्लीव्हलेस असे विविध प्रकार आणि रंग आता डेनिममध्ये उपलब्ध आहेत. डेनिमचे जम्पसूटसुद्धा हिवाळ्यात छान दिसतात. छोटीशी ट्रिप, एक दिवसाची पिकनिक किंवा अगदी ऑफिसच्या कॅज्यूअल वेअरसाठी डेनिम जम्पसूट हा उत्तम पर्याय आहे. तुम्हाला इनफॉर्मल, आरामशीर लूक हवा असेल किंवा तुमच्या नेहमीच्या लूकपेक्षा अधिक स्टायलिश आणि लक्षवेधी लूक करायचा असेल तर थंडीच्या दिवसांत डेनिम जॅकेट तुमच्या वॉर्डरोबमध्ये एक अष्टपैलू जोड ठरू शकते. डेनिम हा पाश्चात्त्य संस्कृतीतून आपल्याकडे आलेला प्रकार आहे, पण सध्या भारतातली त्याची लोकप्रियता, आवड आणि वापर इतर कुठल्याही देशांपेक्षा जास्त आहे.

## स्वेट शर्ट्स

हा प्रकारसुद्धा थंडीच्या दिवसांत फार स्मार्ट आणि कुल दिसतो. खरंतर स्वेट शर्ट घालायची सुरुवात नव्या पिढीतील मराठी-हिंदी सिनेतारकांनी केली आणि तेव्हापासून स्वेट शर्ट्सचा ट्रेण्ड दिवसेंदिवस वाढतो आहे. स्वेट शर्ट मुळात वूलन किंवा थोड्या जाड कापडाचे असतात, ज्याने थंडीत थोडी फार उब मिळते. स्वेट शर्ट हा प्रकारसुद्धा तुम्ही कुठल्याही निमित्ताने घालू शकता. त्यावर छान स्पोर्ट्स शूज आणि मुलींनी केसाची पोनी टेल बांधली की एकदम स्मार्ट लूक येतो. स्वेट शर्टमध्येही अनेक रंग आता पाहायला मिळतात, पण शक्यतो ब्लॅक, ब्ल्यू, व्हाइट असे रंग मुलं आणि मुली दोघांनाही स्मार्ट आणि खुलून दिसतात. स्वेटरच्या तुलनेत हे थोडे पातळ असते, त्यामुळे तुम्ही अगदी उन्हाळ्यातही स्वेट शर्ट्सचा पर्याय निवडू शकता.

## लेदर जॅकेट्स

हुडीज आणि लेदर जॅकेट्स हा प्रकारसुद्धा थंडीतला ट्रेण्डिंग प्रकार आहे. साध्या टी शर्ट्सवर किंवा अगदी कुठल्याही प्रकारच्या कपड्यांबरोबर तुम्ही जॅकेट्स पेअर करू शकता. लेदर जॅकेटची फॅशन कधीही कालबाह्य होत नाही. लेदर जॅकेट विंटर वार्डरोबमधील सर्वोत्तम स्टायलिश आऊटफिटपैकी एक आहे. डेनिम जॅकेट किंवा स्वेट शर्टपेक्षा हे जॅकेट थोडं जास्त महाग असतं, पण एखादं तरी जॅकेट तुमच्या स्टायलिश कपड्यांच्या कलेक्शनमध्ये असायला हवं. लेदर जॅकेट वापरताना थोड्या फार टिप्स फॉलो करणं गरजेचं आहे, जेणेकरून ते जास्त काळ टिकतं. लेदर जॅकेट प्राण्यांच्या कातडीपासून बनवलं जातं, त्यामुळे ते खरेदी करताना पूर्णपणे माहिती घेऊन आणि तपासून पहा. ते धुण्यासाठी कुठल्याही सोल्यूशनच्या पाण्यात भिजवून धुवा, मशीनमध्ये लेदर जॅकेट धुतलं तर लगेच खराब होऊ शकतं. जॅकेट परिधान करताना आणि कपाटात ठेवताना ते किंचितही ओलसर राहणार नाही याची काळजी घ्या. या जॅकेट्समध्येही वेगवेगळे प्रकार असतात जसं की ओपन झिप, लेदर बॉम्ब, पफर जॅकेट आणि अजून बरंच काही. एकेकाळी जॅकेट फक्त ठरावीक वर्गाची मक्तेदारी मानली जायची, परंतु आता सर्रास कोणीही वेगवेगळ्या पद्धतीने जॅकेट परिधान करू शकतं.





- थंडीतल्या फॅशनची गंमत म्हणजे मुलं-मुली, स्त्री-पुरुष सर्वांनाच सेम पद्धतीचे, स्टाइलचे कपडे वापरतात. कारण जॅकेट्स, हुडी, स्वेटर हे सगळंच कपड्यांच्या युनि-सेक्स प्रकारात येतात. विंटर फॅशनमध्ये अनेक प्रयोग करता येतात, असं तरुणाईचं म्हणणं आहे. हे कपडे कुठल्याही प्रकारे पेअर केले तरी खूप स्मार्ट आणि स्टायलिश दिसतात. आता आपण जरी फक्त कपड्यांबद्दल बोललो असलो तरी हिवाळ्यात शाली आणि स्कार्फ हेसुद्धा तरुणाईच्या कलेक्शनमध्ये पाहायला मिळतात. त्यांचं असं म्हणणं आहे की थंडीत तर ते उपयोगी पडतंच, पण स्कार्फ हा आता रोजच्या जगण्याचा एक भाग झाला आहे. थंडी, धुळ, वारा, ऊन कधीही स्कार्फ हा लागतोच. तरुण पिढी मुळातच शॉपोहोलिकच असल्याने आजकाल सगळ्यांकडेच शाली, कोट्स असे वेगवेगळे प्रकार पाहायला मिळतात.
- हिवाळ्यात फॅशनचं प्रमाण वाढण्याचं कारण म्हणजे तरुणाईची भटकंती. कुठेही फिरताना गरम कपडे (थर्मल्स) घेऊन फिरावं लागतं, त्यामुळे काही जण फक्त थर्मल्स आणि त्यावर जॅकेट्स पेअर करतात, तेही खूप छान दिसतं. तुम्ही जर उत्तरेकडे फिरायला जाणार असाल तर थंडीतल्या कपड्यांची खास तयारी करणं गरजेचं आहे. अंगात घालणाऱ्या कपड्यांबरोबरच कानटोपी, हात मोजे आणि गम बूट्स या बेसिक गोष्टी तुमच्याकडे असणं अतिशय महत्त्वाचं आहे. त्यामध्येही तुम्हाला हवे तसे प्रकार, फॅशन, स्टाइल मिळते. कुडकुडत्या थंडीत फॅशनेबल कपड्यांची हौसही भागवता येते आणि गुलाबी थंडीची मजाही घेता येते. त्यामुळे एकूणच सगळ्या ऋतूंमध्ये हिवाळ्यातील फॅशन तरुणाईला अधिक भावते.

## लॉन्ग कोट्स

लॉन्ग कोट्स पूर्वीच्या काळी स्त्रिया साडीवर परिधान करत असत. त्यानंतर हा प्रकार सिनेमातही बऱ्याचदा पाहायला मिळाला. पूर्वी स्त्रिया बऱ्याचदा महागड्या काश्मिरी पश्मिना कोट्सना अधिक पसंती द्यायच्या. आज त्यामध्येही वेगवेगळे प्रकार आले आहेत. परंतु, अशा पद्धतीचे कोट्स आणि जॅकेट्स यात बराच फरक जाणवतो. हे कोट्स जास्त करून व्हेल्वेट आणि पश्मिना प्रकारात उठावदार आणि राजेशाही दिसतात. आजही ती पद्धत विशिष्ट सामुदायांमध्ये प्रचलित आहे. परदेशात राहणारे, ये - जा करणारे आणि उत्तर भारतात राहणाऱ्यांकडे असे कोट्स हमखास पाहायला मिळतात. उन्हाळ्यात आणि पावसाळ्यात मात्र याचा फार उपयोग होत नाही, त्यामुळे अगदी गरज असेल तरच हे कोट घ्यावेत.

# हिवाळ्यात ऑफिसला जाताना घाला हे कपडे

**हिवाळा म्हणजे कोणतीही फॅशन न करण्याचा ऋतू असे म्हटले तरी चालेल. कारण कोणतेही फॅशनेबल कपडे घातले तरीही त्यावर स्वेटर घालावेच लागते. सतत स्वेटर घातले तर सहकारी, मित्र चिडवतात. किंवा आजारी आहेस का असे विचारतात. बर हे ऐकायचे नसेल तर थंडीत एसीतही कुडकूडत बसावे लागेल.**

तुम्हाला माहिती नसेल पण हिवाळ्यात तुम्ही तुमच्या लुकवर अनेक प्रयोग करू शकता. जर तुम्हाला इंडो वेस्टर्न लूक आवडत असेल, तर काही मिक्स मॅचच्या मदतीने तुम्ही असा लुक करू शकता. जर तुम्हाला पूर्णपणे वेस्टर्न स्टाईल हवी असेल तर तेही करता येते. या सर्व लूकमुळे तुमचे संपूर्ण व्यक्तिमत्व तर स्टायलिश आणि मस्त होईलच, शिवाय तुम्ही थंडीपासूनही वाचाल. चला तर मग जाणून घेऊया तुम्ही ऑफिसमध्ये कोणते हिवाळ्यातील कपडे वापरून पाहू शकता



## विंटर वेअर लाँग कोट

ऑफिससाठी विंटर वेअर लाँग कोट स्टायलिश आहे. हे कोट ऑफिससाठीही एकदम परफेक्ट दिसतात. तुम्ही तुमच्या जीन्स, ट्राउझर्स साडीसोबत ओव्हरकोट किंवा लांब कोट देखील घालू शकता. तुम्ही कोट खरेदी करताना डार्क रंग निवडावे. यामध्ये काळा, नेव्ही ब्लू किंवा गडद राखाडी असे रंग कोणत्याही ड्रेसवर उठून दिसतील.

## ब्लेझर

हिवाळ्यात ऑफिससाठी क्लासी लूक ट्राय करणार असाल., तर तुम्ही ड्रेसवर ब्लेझर घालू शकता. त्यावर तुम्ही हायनेक किंवा विंक पुलओव्हर स्टाईल करू शकता. त्यासोबत जीन्स किंवा ट्राउझर्स छान दिसतील. बोल्ड लूकसाठी तुम्ही त्यासोबत लेदरचे बूट ट्राय करू शकता. तुम्ही हे ब्लेजर साडी, शॉर्ट ड्रेस यावरही मॅच करू शकता.

## ट्रेंडी कफ्तान्स

वूलन कफ्तान्सची फॅशन पुन्हा आली आहे. ती शाल आणि स्वेटर म्हणून वापरू शकते. हे इंडियन आणि वेस्टर्न अशा दोन्ही स्टाइलवर चांगले दिसते. जीन्स, साडी, सूट या सगळ्यांसोबत तुम्ही त्यावर कफ्तान्स वापरू शकता.

## वूलन लाँग शर्ट

जर तुम्हाला सगळ्यात हटके लूक हवा असेल तर तुम्ही तुमच्या हिवाळ्यातील ऑफिस लूकमध्ये वूलन लाँग शर्टचा समावेश करू शकता. तुम्ही वूलनच्या लाँग शर्टवर ब्लॅक जीन्स आणि त्यावर फॅन्सी बूट घालू शकता.

# स्टायलिंगचा हिवाळी मोड ऑन! ग्लॅमरस लुकसाठीचे फॅशन ट्रेंड!

**फॅशन ही ऋतूनुसार बदलत असते. हिवाळ्यात लोकरीच्या कपड्यांना फार मागणी असते. या ऋतूत फॅशनप्रेमींना स्टायलिंग करण्यासाठी असंख्य पर्याय उपलब्ध असतात. हल्ली लोकरीच्या कपड्यांमध्ये नवनवीन पर्याय पाहायला मिळतायत. कॅज्युअल वेअर्ससाठी पुलोवर्स, रिब्ड, नायटेड फॅब्रिकच्या कपड्यांना पसंती दिली जाते. तुम्ही जर हट के लुकचे चाहते असाल तर हिवाळ्यातले फॅशन ट्रेंड्स नक्की फॉलो करा**

- पुलोव्हर्स आणतील लुक : सध्या तरुणींमध्ये पुलोव्हर पॅटर्नची प्रचंड क्रेझ पाहायला मिळतेय. पुलोव्हर्सचा फायदा म्हणजे हे कपडे तुम्ही कोणत्याही ऋतूत आरामात घालू शकता. पुलोव्हर टॉप्स वर्षानुवर्षे टिकतात. शिवाय, ते खिशाला परवडणाऱ्या किंमतीत उपलब्ध असतात. या पॅटर्नमध्ये असणारे भन्नाट डिझाइन्स आणि रंग तरुणींना आकर्षित करत आहेत. तरुणांमध्येही पुलोव्हर्सची फॅशन जोमात आहे. शिमर लुक असणारे पुलोव्हर टॉप्स तरुणींना कमालीची भुरळ घालत आहेत. को-ऑर्ड पुलोव्हर्सची सध्या चलती पाहायला मिळतेय. फुल स्लीव्हज, क्रॉप, क्रॉप टॉप, कॅमी, टँक, पिप्लम, ब्लाउज टॉप यामध्ये पुलोव्हर पॅटर्न पसंत केलं जात आहे.
- ट्रेंडी स्वेट टॉप्स : हिवाळा आणि स्वेट टॉप्स हे समीकरण जुनं आहे. पण, बाजारात सध्या स्वेट टॉप्समध्ये स्टायलिश पर्याय दिसतायत. पूर्वी स्वेटर केवळ हिवाळ्यापुरतंच मर्यादित होते. पण, आता कॅज्युअल आणि पार्टीवेअर्ससाठीसुद्धा स्वेट टॉप्सना पसंती दिली जातेय. विशेषतः क्रॉप टॉप्स तरुणींचं लक्ष वेधून घेतायत. स्वेट टॉप्समध्ये फर पॅटर्नला प्रचंड मागणी आहे. टोपी स्टायलिंगमध्ये भर घालते. सध्या ट्रॅक सूट्सची चलती पाहायला मिळतेय.
- हट के नेक-स्लीव्हज : फॅशन करताना व्यक्तिमत्त्वाला शोभेल अशा नेक पॅटर्नची निवड करणं अत्यंत महत्त्वाचं मानलं जातं. रिब्ड टॉप्स आणि टर्टल नेक म्हणजेच हाय नेक यांचं गणित उत्तम जुळतं. टर्टल नेकवर छानसं नेकपिस तुमच्या लुकला चार चांद लावेल. विंटर कलेक्शन टॉप्समध्ये भरपूर प्रकारचे नेक आणि स्लीव्हज डिझाइन्स बाजारात सहजरित्या उपलब्ध होतात. नेकमध्ये वी, ऑफ शोल्डर, कॉलर तर स्लीव्हजमध्ये बलून, कोल्ड शोल्डर, पफ स्लीव्हजना पसंत केलं जातं.
- स्कार्फ दिसेल शोभून : परफेक्ट विंटर लुक करताना स्कार्फला विसरून कसं चालेल? साधारण कपड्यांनाही स्टायलिश आणि हट के लुक देण्याचं काम स्कार्फ करतो. फॅशन जगतात स्कार्फला भरपूर महत्त्व आहे. स्कार्फमुळे तुम्ही आकर्षक तर दिसताच. शिवाय, स्कार्फमुळे नेकपिस किंवा श्रग परिधान करण्याचीही गरज भासत नाही. हिवाळ्यात लोकरीच्या टोपीचीही क्रेझ पहायला मिळते. कारण स्कार्फ गळ्यासोबतच कानाभोवती गुंडाळण्याचा पर्याय असतो. तुमच्या आऊटफिटनुसार स्कार्फची निवड करा. तुमच्या कपाटात किमान एक तरी मफलर किंवा लोकरीचा स्कार्फ असणं गरजेचं आहे, असं स्टायलिस्ट सांगतात.
- जॅकेट्स भारी : फॅशनप्रेमींना कायम भुरळ घालणारा प्रकार म्हणजे जॅकेट. जॅकेट तुमचं व्यक्तिमत्त्व खुलवतं. हिवाळ्यात परफेक्ट विंटर लुक पाहिजे असेल तर पुलोव्हर किंवा रिब्ड पॅटर्नच्या जॅकेट्सची निवड अचूक ठरेल. तरुणांमध्ये झिपर्सची चलती असते. हिवाळ्यात घराबाहेर पडताना हलकंफुलकं जॅकेट तुमच्या सौंदर्याला नक्कीच चार चांद लावेल. तुमच्या पेहरावावर शोभेल अशा जॅकेटची निवड करावी.
- ॲक्सेसरीज फॅशन : केवळ पेहरावातच नाही तर ॲक्सेसरीजमध्येसुद्धा विंटर फॅशनची सरशी पाहायला मिळतेय. बाजारात लोकरीच्या धाग्यांनी विणून तयार केलेले चोकर लक्ष वेधून घेतायत. काही टॉप्ससोबत मॅचिंग चोकर मिळतं. या ऋतूसाठी मुलायम आणि कम्फर्टेबल चपलांची गरज असते. आजकाल फर सँडल्सना पसंती मिळतेय. लोकर किंवा ब्रेडेड बॅग्सचा पर्यायही निवडू शकता. शिवाय, रंगबेरंगी सुतळीच्या बॅग्सही आकर्षक दिसतात.

## शॉर्ट न्यूज

### सरपंच पतीला जीवे मारण्याचा प्रयत्न

**जामखेड :** तालुक्यातील खर्डा येथील सरपंच पती तसेच जामखेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक वैजीनाथ पोपटराव पाटील यांना लाकडी दांडके, लोखंडी पाईप, व लाथाबुक्यांचा वापर करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे. ही घटना साई दर्शन खानावळजवळ खर्डा येथे घडली आहे. यातील आरोपींच्या विरूद्ध भारतीय दंड संहिता २०२३ अंतर्गत विविध कलमांचा वापर करून खर्डा पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### ग्रामस्थांचा जलसमाधी आंदोलनाचा इशारा

**शेवगाव :** तालुक्यातील गोळेगाव येथील पाझर तलावाच्या भिंतीची उंची वाढविणे, तसेच भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा विभागाच्या यादीतील वर्गवारीत शासकीय विहिरीसाठी गोळेगावचा समावेश व्हावा, या मागणीसाठी गेल्या दीड महिन्यापासून धरणे आंदोलन सुरू आहे. परंतु या आंदोलनाला शासनाकडून ठोस अशी भूमिका घेण्यात न आल्याने ग्रामस्थांनी आता एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात कुठल्याही क्षणी जलसमाधी आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा मुख्यमंत्र्यांसह मंत्रालयातील सर्वच मंत्र्यांना लेखी निवेदनाद्वारे दिला.

### श्रीगोंद्यात पाणी योजनांचा केवळ फार्स

**श्रीगोंदा :** तालुक्यातील सुमारे ७९ गावांत ग्रामीण पाणी पुरवठा योजना जिल्हा परिषद आणि उर्वरित मोठ्या गावात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत राबविण्यात आलेल्या अनेक पाणी योजनांचे तीनतेरा वाजलेले असताना शासनाकडून पुन्हा नव्याने राबविण्यात येणाऱ्या योजना या केवळ फार्स आहे की काय? असा प्रश्न नागरिक उपस्थित करु लागले आहेत. अनेक गावात पाणी योजनाचे बंद असलेले काम आदी सुरु करा, अशी मागणी एका गटाकडून सुरु आहे. दुसरीकडे प्रशासन कारवाईच्या नावाखाली केवळ ठेकेदार आणि ग्रामपंचायतींना नोटीसा देण्यातच व्यस्त आहे.

### माणिकराव कोकाटेंच्या वक्तव्यावर टीका

**अकोले :** कर्जमाफीच्या पैशातून शेतकरी साखरपुडा व लग्न करतात आशयाचे वक्तव्य राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केले आहे. त्यांच्या या वक्तव्यावर विविध स्तरातून टीका होताना दिसत आहे. यावरूनच किसान सभा देखील आक्रमक झाली आहे. सरकारच्या धोरणांचा परिणाम म्हणून शेतकरी किती अडचणीत आहेत याची काडीची जाणीव नसल्यानेच कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी असे विधान केले असल्याची टीका किसान सभेचे नेते डॉ. अजित नवले यांनी केली आहे.

### वांबोरी परिसरात वादळामुळे ४२ पोल पडले

**राहुरी :** तालुक्यातील वांबोरीसह परिसरातील गावे व वाड्यावंस्त्यांवर गुरूवारी रात्री झालेल्या वादळी पावसांत मोठे नुकसान झाले. अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली. तर लघू व उच्चदाबाचे ४२ पोल कोसळल्यामुळे वीज खंडित झाली होती. महावितरणचे सुमारे सव्वादोन लाखांचे नुकसान झाले. शुक्रवारी दुपारपर्यंत बहुतांश ठिकाणचा वीजपुरवठा सुरळीत झाला. अचानक वादळी पावसाला सुरूवात झाली, वाऱ्याचा वेग अधिक असल्याने अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली. तसेच कापणीला आलेल्या गहू पिक भुईसपाट झाले. तसेच फळबागांनाही या वादळाचा फटका बसला.

# आजीच्या पुण्यस्मरणानिमित्त संगीत साहित्य वाटप!

## आरोटे परिवाराने जपली सामाजिक बांधिलकी



**कोतुळ : प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या आजी स्वर्गीय गं.भा. स्वर्गीय पार्वतीबाई बाबुराव आरोटे आरोटे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त कोतुळ येथील कोतुळेश्वर वारकरी शिक्षण संस्थेतील बाल वारकऱ्यांना संगीत साहित्य वाटप करण्यात आले. रामनवमीच्या पावन पर्वकाळात, ग्रामस्थांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या कार्यक्रमात तबला, पखवाज, हार्मोनियम यांसारख्या संगीत साधनांचे वितरण करण्यात आले.**

या कार्यक्रमास कोतुळ ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच संजय लोखंडे, पत्रकार सुनील गीते, पत्रकार विनय समुद्र, कोतुळेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह. भ. प. नितीन महाराज गोडसे, पत्रकार संघाचे उपाध्यक्ष अशोकराव शेळके, ज्येष्ठ पत्रकार विनय समुद्र, माजी उपसरपंच संजय लोखंडे, सुनील गीते संस्थेचे मार्गदर्शक राधाकिसन गोडसे, सौ,परिघाताई आरोटे तसेच गावातील अनेक मान्यवर, पालक आणि बाल वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना डॉ. विश्वासराव आरोटे म्हणाले, ''योग्य वेळी दिलेले योग्य संस्कार हेच विद्यार्थ्यांना योग्य दिशा देतात. त्यांच्यातून आदर्श नागरिक घडतात जे भविष्यात देश व समाजाची सेवा करतात. कोतुळ हे माझे मामाचं गाव आहे. माझं संपूर्ण बालपण इथेच गेलं. विनय समुद्र, अशोक शेळके, सुनील गीते यांच्यासोबतच्या आठवणी आजही माझ्या मनात ताज्या आहेत. मी कितीही मोठा झालो तरी जिथे माझं बालपण गेलं त्या भूमीचं काहीतरी देणं लागतो ही भावना माझ्या मनात आहे. त्यामुळे या गावातील बाल गोपालांसाठी काही चांगलं करणं हे माझं नैतिक कर्तव्य आहे.''

कोतुळेश्वर वारकरी शिक्षण संस्थेच्या कार्याबद्दल विशेष कौतुक करत त्यांनी संस्थेचे कार्य अधिक प्रभावीपणे पुढे नेण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. ''या पुढेही या संस्थेच्या माध्यमातून गावातील बाल वारकऱ्यांना संस्कार व सांस्कृतिक शिक्षण देण्यासाठी मला जे काही करता येईल, ते मी नक्कीच करीन,'' असेही त्यांनी जाहीर केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. नितीन महाराज गोडसे यांनी तर उपस्थितांचे आभार पत्रकार सुनील गीते यांनी मानले. या उपक्रमामुळे कोतुळ गावात सामाजिक व सांस्कृतिक जागर निर्माण झाला असून, पार्वताआजींच्या पुण्यस्मरणाचे औचित्य साधून ग्रामस्थांना व बाल वारकऱ्यांना एक प्रेरणादायी संदेश मिळाला.

# ११६ झेडपी शाळांत २५०० विद्यार्थी घेताहेत टॅबवर शिक्षण !

## खासगी, सामाजिक निधीतून विद्यार्थी हायटेक | लोकवर्गणीतून इंटरनेट

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**



**जिल्हा परिषद शाळांना 'मिशन आपुलकी'चा बुस्टर डोस देऊन कायापालट घडवण्यात प्रशासनाला यश मिळाले आहेत. खासगी कंपन्यांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून ११६ शाळांमधील सुमारे २ हजार ५०० विद्यार्थ्यांच्या हाती टॅब आले आहेत. शैक्षणिक सॉफ्टवेअरसह सुसज्ज असलेल्या टॅबवर विद्यार्थी डिजिटल शिक्षण घेत आहेत. काही शाळांनी टॅब लॅब उभारली आहे. विशेष म्हणजे गावपातळीवर लोक वर्गणीतून इंटरनेट सुविधाही उपलब्ध केल्या आहेत. त्यामुळे पुढील कालावधीत विद्यार्थी पट वाढीस मदत होणार आहे.**

जिल्हाभरात जिल्हा परिषदेच्या साडेतीन हजारांवर प्राथमिक शाळा तसेच उच्च प्राथमिक शाळा आहेत. याव्यतिरिक्त खासगी शाळाही आहेत. मागील काही वर्षांत जिल्हा परिषद शाळांचा पट घसरत असल्याने, शिक्षक संख्या कमी होत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी आशीष येरेकर यांनी मिशन आपुलकीला गती दिली. शासनाचा निधी अपुरा असल्याने गावस्तरावर लोकवर्गणीतून शाळांत भौतिक सुविधा वाढवण्यावर भर देण्यात आला.

मागील वर्षी शासनाच्या तरतुदीतून सुमारे दहा कोटींचे इंटरॅक्टिव्ह बोर्ड लावण्यात आले. आता टॅब उपलब्ध करून देऊन, विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जात आहे. या टॅबमध्ये सीएसई बोर्डचा अभ्यासक्रम याव्यतिरिक्त मराठी माध्यमांच्या काही विषयांचा अभ्यासक्रम आहे, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले. सप्टेंबर २०२४ मध्ये ७० शाळांमध्ये १ हजार ४०० टॅब वाटप करण्यात आले. जिल्हा शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी, टॅबचा नियमीत वापर करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाल्यानंतर, दोन दिवसांपूर्वी पुन्हा ४६ शाळांमध्ये प्रत्येकी २० या प्रमाणे ९२० टॅबचे वाटप करण्यात आले. आतापर्यंत जिल्हाभरात टॅबची संख्या अडीच हजारांवर पोहोचली आहे. याचा वापर पहिली ते पाचवीपर्यंतचे तीन ते साडेतीन हजार विद्यार्थी करतात, असा दावा शिक्षण विभागाने केला आहे.

खासगी कंपन्यांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळावे यासाठी प्रयत्न केला जातो. एका टॅबची किमती सुमारे १५ हजारांवर आहे. आतापर्यंत अडीच हजार टॅबवर तब्बल ३.७५ कोटींचा खर्च करण्यात आला आहे.

## वाचकांच्या लेखणीतून

# ठुमरीतील काव्य



ठुमरी हा एक उपशास्त्रीय गायन प्रकार आहे. त्यात शास्त्रीय संगीत आणि लोकसंगीत यांचे मिश्रण असते. यात एक स्थायी आणि एक अंतरा असतो. ठुमकणे या क्रियापदापासून ठुमरी शब्द सिध्द झाला. थोर ठुमरी गायिका निर्मला देवींनी गायलेली एक सुंदर ठुमरी आहे.

बेदर्दी, तू क्या जाने प्रीत?
झूटी दिखाई रीत ।।धृ।।
प्रेम डगर जो सब कुछ हारे
होगी उसी की जीत ।।१।।

यावरून हे लक्षात येईल. या ठुमरीत प्रीतीची रीत सांगताना वर्णन केले आहे :- हे निर्दयी, प्रीती काय चीज आहे हे तुला कसे कळावे? जगाला घाबरून तू बेईमान झालास. तू आपल्या प्रेमनिष्ठेला कलंक लावला आहेस. ही तुझी रीत खोटी आहे. आपल्या जवळचे सारे उधळून टाकतो. प्रेमाची अवघड डगर चढून जातो तोच खरा विजयी होतो.

स्वर्गीय निर्मला देवी एक श्रेष्ठ ठुमरी गायिका होत्या. रो रो नैन गवायें, ना जा पी परदेस, सावन बीता जाये, मोरे बालम छाये रहे परदेस, प्रेम न जाने रसिया, का करूं सजनी आये न बालम अशा सुंदर सुंदर ठुमऱ्या गायलेल्या आहेत. या ठुमऱ्यांतून काव्याचे झरेही वाहतात. स्वर्गीय निर्मला देवी यांनी गायलेली ही प्रसिध्द ठुमरीच पाहू :-

मैंने लाखों के बोल सहे
सितमगर तेरे लिये ।।धृ।।
सबक वफ़ा का सिखाया भी जा नहीं सकता
जो सीख लो तो भुलाया भी जा नहीं सकता
ये हसीं दर्द छुपाया भी जा नहीं सकता
कोई पूछे तो बताया भी जा नहीं सकता ।।१।।

या ठुमरीतही प्रीतीची रीत सांगितली आहे. किंबहुना प्रीतीचा एक सिध्दान्तच येथे सांगितला आहे. ती आपल्या प्रियकराला म्हणते, अरे जुलमी, तुझ्यासाठी मी जगाची लाखो बोलणी खाल्ली. पण तुला त्याची पर्वा वाटत नाही. प्रेमनिष्ठेचा पाठ कोणाला शिकविता येत नाही. शिकून घेतला तर विसरणे अशक्य. हे हवेहवेसे सुंदर दुःख लपवून ठेवता येत नाही. कुणी विचारले तर सांगताही येत नाही. या प्रीतीच्या तरल भावना जेव्हा ठुमरी या गायन प्रकारातून व्यक्त होतात तेव्हा जास्तच उजळून निघतात!

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

# स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शत प्रतिशत भाजप

## ठाकरे गटाकडून माध्यमांसमोर अस्तित्व दाखवण्याचा प्रयत्न मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे प्रतिपादन

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**




**विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या यशाची पुनरावृत्ती स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत करण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी तयारीला लागावे असे म्हणत मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शत प्रतिशत भाजपची घोषणा केली आहे.**

राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत जनतेने एवढी मोठी चपराक दिली आहे की उबाठा गट शिल्लक रहातो की नाही याचीच चिंता अधिक आहे.माध्यमासमोर अस्तित्व दाखविण्याचे काम त्यांचे सुरू आहे. कोल्हेकुई करणाऱ्याकडे भाजप लक्ष देत नाही.

**दोन मुद्द्यावर मतदान**

राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, जनतेने विचारधारा आणि प्रगती या दोन मुद्यांच्या आधारे भाजपला राज्यात आणि केंद्रात सत्तेवर बसविले आहे. भाजप हा देशातील सर्वांत मोठा आणि सर्वाधिक सदस्य संख्या असलेला पक्ष झाला आहे. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शत प्रतिशत भाजपसाठी आपणा सर्वांना बूथ पातळीवर संघटन मजबूत करून तयारी सुरू करावी असेही त्यांनी म्हटले आहे.

स्थानिक स्वराज्य संघटनेसाठी परिश्रम घ्या राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, शेतकऱ्यांच्या संदर्भात बोलताना जपूनच वक्तव्य केले पाहीजे.माणिकराव कोकाटे यांच्या मनात तशी भावना नसावी सरकार शेतकऱ्यांच्या प्रती संवेदनशीलच आहे. भाजपचे राज्यात दीड कोटी सदस्य आहेत, त्यात शिर्डी विधानसभा मतदारसंघात ७० हजार सदस्य आहेत. जिल्ह्यातही भाजपचे मोठ्या प्रमाणावर सदस्य असून आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपल्याला यश मिळवण्यासाठी कामाला लागले पाहिजे. त्यासाठी सर्वांनी परिश्रम घ्यावे असेही त्यांनी म्हटले आहे.

नदी जोड प्रकल्पांना चालना

राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, महाराष्ट्र सरकारचे धोरण आहे की राज्याला पूर्णपणे दुष्काळमुक्त करणे राज्याचे धोरण असून,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली त्याची कार्यवाही सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून पुराचे अतिरिक्त पाणी वाया जाऊ नये म्हणून नदी जोड प्रकल्पांना चालना दिली जात आहे. राज्याची सिंचन क्षमता पूर्वी ३.८६ लाख हेक्टर होती, आता ती ५५ लाख हेक्टरवर पोहोचली आहे.

(पान १ वरून)

## अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर लाडकी बहीण योजनेचा हप्ता !

अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर हे पैसे महिलांच्या खात्यात जमा होतील, असे आदिती तटकरे यांनी म्हटले आहे.

**बनावट कागदपत्रांच्या आधारे लाभ घेणाऱ्या बहिणींवर गुन्हा दाखल**

बनावट कागदपत्रांच्या आधारे योजनेचा लाभ घेणाऱ्या बहिणींवर पोलिसांत रीतसर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी दिली होती. बनावट अर्जदारांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत एकदाही सन्मान निधी वितरित झाला नसून, सखोल चौकशी करून त्यांच्यावर कडक कारवाई करण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी म्हटले होते. मात्र, या प्रकरणात पुढे काय? या प्रश्नाचे उत्तर अद्याप मिळालेले नाही.

**अर्जदार महिलेला प्रति महिना दीड हजार रुपये**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत बनावट लाभार्थींची नोंदणी करण्याचा गैरप्रकार हा स्थानिक अंगणवाडी सेविकांच्या सजगतेमुळे अर्ज पडताळणीच्या वेळी सप्टेंबर महिन्यातच निदर्शनास आला आहे. याबाबत ४ ऑक्टोबर रोजी पोलिसांत रीतसर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आदिती तटकरे म्हणाल्या की, सदर बनावट अर्जदारांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत एकदाही सन्मान निधी वितरित झाला नसून, सखोल चौकशी करून त्यांच्यावर कडक कारवाई करण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे.

महिला व बालविकास विभाग अर्जदारांच्या छाननीबाबत अत्यंत सजग असून कोणत्याही प्रकारची फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे. महिला मतदार डोळ्यासमोर ठेवून विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत सरसकट प्रत्येक अर्जदार महिलेला प्रति महिना दीड हजार रुपये खात्यात पाठवण्यात आले.

## आमदार निवासात भाजप कार्यकर्त्याचा मृत्यू

रात्री १२.३० च्या सुमारास त्यांना हृदयविकाराच्या वेदना जाणवू लागल्या. त्यावेळी रुग्णवाहिकेसाठी वारंवार फोन करण्यात आला मात्र कोणतीही रुग्णवाहिका उपलब्ध झाली नाही. अखेर पोलिसांना फोन करण्यात आला. त्यानंतर त्यांना पोलिसांच्या वाहनातून जीटी रुग्णालयात नेण्यात आले मात्र तेथे नेल्यावर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेमुळे खळबळ उडाली आहे.

आमदार निवासातील फोन गेल्यानंतर रुग्णवाहिका उपलब्ध होत नसेल तर सर्वसामान्यांच काय असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.चंद्रकांत धोत्रे यांच्या कुटुंबियांनी यासंबंधी कोणतीही तक्रार दाखल केली नाही. त्यामुळे पोलिसांनी या घटनेसंबंधी कोणतीही कारवाई केली नाही. धोत्रे यांचे नातेवाईक त्यांचा मृतदेह गावी घेऊन जाण्यासाठी रवाना झाले आहेत.

चंद्रकांत धोत्रे यांचा मुलगा विशाल धोत्रे हा आमदार विजयराव देशमुख यांचा कार्यकर्ता आहे. चंद्रकांत धोत्रे हे बैठकीनिमित्त मुंबईत आले होते. मात्र रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्याने त्यांचा मृत्यू झाला आहे.

## दौलताबादच्या देवगिरी किल्ला परिसरात भीषण आग

**असलेले अनेक जीवाणू प्राणी तसेच जुन्या वास्तू जळून नष्ट झाल्याचे समोर आले आहे. मात्र, या आगीचे कारण कळू शकलेले नाही.**

या आगीची माहिती मिळताच किल्ला प्रशासनाने अग्निशमन विभागाला याची माहिती दिली. त्यानंतर अग्निशमन दलाच्या वाहनांनी घटनास्थळी धाव घेतली. परंतु अग्निशमन दलाच्या वाहनांना किल्ल्यात प्रवेश करण्यात अडचणी निर्माण होत होत्या. आधीच कडक उन्हामुळे किल्ल्यावरील गवत व झाडी सुकली आहेत. त्यात वाऱ्यामुळे आगीने रौद्ररूप धारण केले. किल्ल्यावर उपस्थित कर्मचाऱ्यांनी व स्थानिकांनी हिरव्या झाडांच्या फांद्या तोडून आग विझवण्याचे प्रयत्न सुरू केले.

किल्ल्याच्या आवारात असणाऱ्या गवताला आणि झाडांना उन्हामुळे आग लागली असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. ही आग विझवण्याचे अग्निशमन दलाचे कर्मचारी शर्थीचे प्रयत्न करत आहेत. मात्र, किल्ल्याच्या आतल्या भागात वाहन जाऊ शकत नसल्याने किल्ल्याच्या आतल्या भागात लागलेली आग हिरव्या झाडांच्या मदतीने विझवण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

अधिकची माहिती अशी की, किल्ल्याला तीन तटबंद्या आहेत, या तिन्ही तटबंद्याच्या आतल्या बाजूने सर्वत्र आग लागली आहे. या ठिकाणी असलेले गवत संपूर्णपणे जळत आहे. किल्ल्यातील चाँदमिनार देखील धूरांच्या लोटात गेल्याचे पाहायला मिळाले.तसेच किल्ल्याच्या वरील बाजूला असलेला महल देखील धूरात गडप झाला असल्याचे यावेळी पाहायला मिळाले. किल्ल्यातील जुने अवशेष, लाकडी वास्तूंना देखील आगीचा फटका बसला असल्याची माहिती समोर आली आहे.

## उदंड झाली खाती, पण अधिकार किती?

बोलायला तयार नाहीत.

धोरणात्मक निर्णयांची कोणतीही माहिती राज्यमंत्र्यांना दिली जात नाही. या विषयीच्या फायली राज्यमंत्र्यांकडून कॅबिनेट मंत्र्यांकडे आणि मग मुख्यमंत्र्यांकडे गेल्यास धोरणात्मक निर्णय प्रक्रियेत राज्यमंत्र्यांनादेखील स्थान मिळू शकेल. पण तसे होताना दिसत नाही. राज्यमंत्री अभ्यासू असताना, ते आपापल्या विभागाच्या कामकाजात रस घेत असताना त्यांना अधिकार दिले जात नाहीत. त्यामुळे त्यांच्या मनात नाराजीची भावना आहे.

# पारनेरच्या भैरवनाथांचा शुक्रवारी यात्रोत्सव

## बैलगाडा शर्यतींनी शनिवारी होणार सांगता

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेरकरांचे ग्रामदैवत श्री. भैरवनाथांचा यात्रोत्सव शुक्रवार दि.११ एप्रिल रोजी असून गुरूवार दि. १० एप्रिलपासून विविध कार्यक्रमांनी यात्रेला सुरूवात होणार आहे. शनिवार दि.१२ एप्रिल रोजी बैलगाडा शर्यतींनी या यात्रोत्सवाचा समारोप होणार आहे.**

श्री.काळभैरवनाथ सेवा मंडळाच्या वतीने यात्रोत्सवाची तयारी पुर्ण करण्यात आली असून भाविकांना दर्शन सुलभ व्हावे यासाठी नियोजन करण्यात आले आहे. यात्रोत्सवासाठी पारनेर शहरातील पुणे, मुंबई येथे नोकरी, व्यवसायानिमित्त असलेले पारनेरकर मोठया संख्येने हजेरी लावतात. तालुक्याच्या विविध भागांतील भाविकही यात्रेच्या मुख्य दिवशी पारनेरला हजेरी लाऊन श्रींच्या दर्शनाचा लाभ घेतात. या यात्रोत्सवाचा भाविकांनी लाभ घेऊन देवस्थानला सढळ हाताने मदत करण्याचे आवाहन श्री. काळभैरवनाथ सेवा मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.




### शुक्रवारी मुख्य यात्रा

शुक्रवार दि.११ एप्रिल रोजी यात्रेचा मुख्य दिवस आहे. रात्री १२ ते पहाटे २ पंचामृत अभिषेक मंगलस्नान, पहाटे २.३० ते पहाटे ३ महाआरती व लग्नसोहळा, सकाळी ६ वाजता दंडवत, महाआरती, नैवेद्य व शेरणी तर सायंकाळी ५ ते रात्री ८ दरम्यान छबिना व बगाडगाडा मिरवणूक काढण्यात येणार आहे.

### गुरूवारी हळद

गुरूवार दि.१० एप्रिल रोजी देवाला हळद लावण्यात येणार आहे. सकाळी ९ ते ११ हळद व घाणा, दुपारी ३ ते ५ हळद मिरवणूक, सायंकाळी ५.३० महाआरती व सायंकाळी ६ वाजता देवाला हळद लावण्यात येणार आहे. हळदीनिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून त्याचे यजमानपद अशोक सातपुते, बाळासाहेब सातपुते, विजय सातपुते व प्रमोद सातपुते यांना देण्यात आले आहे.

### शनिवारी बैलगाडा शर्यत

शनिवार दि.१२ एप्रिल रोजी सकाळी ८.३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले आहे. सिध्देश्वरवाडी रस्त्यावरील हेलिपॅड ग्राउंड परिसरातील बैलगाडा घाटामध्ये या शर्यतींचे आयोजन करण्यात आले असून त्यामध्ये राज्यातील नामवंत बैलगाडा मालक सहभाग नोंदविणार आहेत.

# जातेगांवच्या भैरवनाथांचे ११३ गावे मानकरी !

## १२ एप्रिल रोजी वार्षिक यात्रोत्सव

जातेगांव : प्रतिनिधी

**राज्यातील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या जातेगांव येथील श्री. काळभैरवनाथांचे ११३ गावे मानकरी आहेत. दरवर्षीच्या वार्षिक यात्रोत्सवात या गावांतील मानकरी परंपरेनुसार सहभागी होतात. दरम्यान यंदाचा वार्षिक यात्रोत्सव शनिवार दि.१२ एप्रिल रोजी पार पडणार असल्याचे देवस्थानच्या वतीने सांगण्यात आले.**

शनिवार दि.१२ व १३ एप्रिल रोजी यात्रोत्सव पार पडणार असून दि.११ एप्रिल रोजी रात्री १० वाजता मुख्य मानकरी असलेल्या पानोली व पळवे खुर्द येथील पालख्यांचे जातेगांमध्ये आगमन होईल. पहाटे साडेपाच वाजता अभिषेकानंतर यात्रोत्सवास प्रारंभ होईल. दिवसभर पालखी व मानाच्या काठया व कवडींचे आगमन झाल्यानंतर रात्री १० नंतर पालखी मिरवणूकीमध्ये शोभेची दारू उडविण्यात येणार आहे. यात्रोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी रविवार दि.१३ रोजी सकाळी मानाच्या काठया व कावडीच्या मिरवणूकीने यात्रोत्सवाचा सांगता होणार आहे.

काळभैरव देवस्थान परिसर विकासासाठी सर्व विश्वस्त प्रयत्नशील आहेत. यात्रोत्सवाची सर्व तयारी विश्वस्त मंडळाकडून करण्यात आल्याची माहिती देवस्थानच्या अध्यक्षा सुनीता पोटघन, उपाध्यक्ष सुरेश बोऱ्हुडे, कार्याध्यक्ष विजय जगताप, खजिनदार शिवाजी भगत, सचिव सचिन ढोरमले, सहसचिव विशाल फटांगडे, खजिनदार सविता ढोरमले, मा. सभापती तथा विश्वस्त गणेश शेळके, जयसिंग धोत्रे, दत्तात्रय ढोरमले, सोनाली ढोरमले, रूपाली पोटघन निर्मला कळमकर, गणेश वाखारे यांनी दिली.



### मानकऱ्यांकडून शोभेच्या दारूची आतिषबाजी

मुख्य यात्रोत्सवाच्या दिवशी काढण्यात येणाऱ्या पालखी सोहळयात मुख्य मानकरी पानोली, पळवे खुर्द, पळवे बुद्रुक, नारायणगव्हाण, वाडेगव्हाण यांच्याकडून शोभेच्या दारूची आतिषबाजी करण्यात येते. पाच वेगवेगळया रस्त्यांनी पाच गावच्या पालख्या जातेगांवमध्ये दाखल होतात. जोगेश्वरी मंदिरासमोर या पालख्या एकत्र येऊन हा पालखी सोहळा मंदिराकडे रवाना होतो.

# श्री साई पतसंस्थेला ३.७६ कोटी नफा

## चेअरमन वसंत चेडे यांची माहिती

पारनेर : प्रतिनिधी

**श्री.साई मल्टीस्टेट पतसंस्थेला ३१ मार्च रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात २ कोटी ७१ लाख तर श्री साई ग्रामीण बिगरशेती पतसंस्थेला १ कोटी ५ लाख असा एकूण ३ कोटी ७६ लाख रूपयांचा ढोबळ नफा झाल्याची माहिती संस्थेचे चेअरमन वसंत चेडे यांनी दिली.**

चेअरमन वसंत चेडे यांनी सांगितले की, संस्थेने गेल्या १० वर्षांच्या कालखंडात सभासद, ठेवीदारांच्या विश्वासावर प्रगती साधली आहे. पतसंस्थेच्या माध्यमातून विविध प्रकारचे कर्ज वितरण करण्यात आले आहे. सभासदांची आर्थिक समृध्दी वाढावी यासाठी वेगवेगळया उद्योग व्यवसायांसाठी कर्ज देण्यात आल्याने अनेक उद्योजक, व्यवसायीक त्यांच्या व्यवसायात स्थिरावले आहेत. संस्थेच्या पारनेर शहर, ढवळपुरी, चिंचोली, कान्हूर पठार, शिरूर व अळकुटी येथे स्वमालकीच्या प्रशस्त व अद्यावत इमारतींमध्ये शाखा आहेत.



### संस्थेची आर्थिक स्थिती श्री.साई मल्टीस्टेट

ठेवी ४० कोटी ३७ लाख, कर्जवितरण ३८ कोटी ६२ लाख, भाग भांडवल १ कोटी २५ लाख, बँक शिल्लक व गुंतवणूक ८ कोटी ८६ लाख, राखीव व इतर निधी ८ कोटी २० लाख, ढोबळ नफा २ कोटी ७१ लाख.

### विविध सुविधा

संस्थेचे कार्यक्षेत्र अहिल्यानगर व पुणे जिल्हा असून संस्थेमार्फत काही शाखांमध्ये सभासदांसाठी लॉकर सुविधाही उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. संस्थेच्या माध्यमातून मोबाईल बँकींग, चेक क्लिअरिंग, एसएमएस सुविधाही देण्यात आल्या आहेत.

प्रशांत बढे
कार्यकारी संचालक

### संस्थेची आर्थिक स्थिती

श्री.साई ग्रामीण पतसंस्था ठेवी २९ कोटी ७८ लाख, कर्जवाटप २७ कोटी ५९ लाख, भाग भांडवल ८७ लाख, बँक शिल्लक व गुंतवणूक ९ कोटी ७५ लाख, राखीव व इतर निधी २ कोटी ९४ लाख, ढोबळ नफा १ कोटी ५ लाख

# बाळासाहेब कोकाटे पोखरीचे चेअरमन

## भाऊ दरेकर यांची व्हा. चेअरमनपदी वर्णी



पोखरी : प्रतिनिधी

**पोखरी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी बाळासाहेब रंगनाथ कोकाटे तर व्हाईस चेअरमनपदी भाऊ नकाजी दरेकर यांची बिनविरोध निवड झाली.**

पोखरी विविध कार्यकारी सोसायटीच्या निवडणूकीमध्ये ठरलेल्या सुत्रानुसार मावळते चेअरमन महादू शंकर पवार व व्हाईस चेअरमन रमेश कारंडे यांनी आपआपल्या पदांचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागी पदाधिकाऱ्यांच्या निवडीसाठी सहकार अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी विकास जाधव यांच्या अध्यक्षतेखाली सहाय्यक निबंधक कार्यालयात संचालक मंडळाच्या विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

बैठक सुरू झाल्यानंतर चेअरमनपदासाठी बाळासाहेब कोकाटे तर व्हाईस चेअरमनपदासाठी भाऊ दरेकर यांचे अर्ज दाखल करण्याच्या निर्धारीत वेळेत दाखल झाले. दोन्ही पदांसाठी प्रत्येकी एकच अर्ज दाखल झाल्याने दोन्ही पदांची बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी विकास जाधव यांनी जाहिर केले. दोन्ही नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.


निवडीप्रसंगी संचालक साहेबराव रोकडे, ज्ञानदेव पवार, लक्ष्मण कारभारी आहेर, बाबाजी खैरे, सावकार गुंजाळ, पिराजी भिवा कारंडे, वारणवाडी ग्रामपंचायतचे माजी सरपंच अंकुश काशिद, ग्रामपंचायत सदस्य संजय थोरात, प्रगतीशील शेतकरी बन्सी भाऊ काशिद, अरूण बेलकर, उत्तम कोकाटे, सचिव राहुल सुडके यांच्यासह संस्थेचे सभासद यावेळी उपस्थित होते. दोन्ही पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करण्यात आल्यानंतर गुलालाची उधळण व फटाक्यांची आतिषबाजी करत जल्लोष करण्यात आला.

# पिंपरी शाळेच्या विद्यार्थ्यांचा अभ्यास दौरा संपन्न

## विद्यार्थ्यांना राज्यात व राज्याबाहेर जाण्याची संधी

पिंपरी जलसेन : प्रतिनिधी

**जिल्हा परिषद आयोजित राष्ट्रीय अविष्कार अभियानांतर्गत पिंपरी जलसेन शाळेच्या विद्यार्थ्यांनी राज्यात व राज्याबाहेरील अभ्यास दौरे यशस्वीरित्या पुर्ण केले.**



राज्यातील व राज्याबाहेरील अभ्यास दौऱ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीनुसार जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते. पीएमसी शाळेतील विद्यार्थ्यांचीही या दौऱ्यासाठी निवड करण्यात आली होती. पारनेर तालुक्यातील उपक्रमशील शाळा म्हणून नावलौकीक असलेल्या पिंपरी जलसेन येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील दोन विद्यार्थ्यांची गुणवत्तेनुसार भोपाळ मध्यप्रदेश येथील अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली होती तर राज्यांतर्गत अभ्यास दौऱ्यासाठी एका विद्यार्थ्याची निवड झाली होती.

या अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाल्याबद्दल व पाच दिवसांचा हा अभ्यास दौरा यशस्वीरित्या पुर्ण केल्याबद्दल या विद्यार्थ्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे. यशस्वी विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक तसेच पालक यांचे पंचायत समितीचे अधिकारी तसेच ग्रामस्थांकडूनही अभिनंदन करण्यात येऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

### सर्व स्तरांवर यशस्वी कामगिरी

जिल्हा परिषदेच्या पिंपरीजलसेन येथील शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येतात. या उपक्रमांमध्ये विद्यार्थी तसेच पालकांचा सक्रिय सहभाग असतो. मार्गदर्शक शिक्षक पुर्ण क्षमतेने विद्यार्थ्यांना न्याय देण्याची भूमिका ठेवतात. त्यामुळे पिंपरी जलसेन शाळा सर्वच स्तरांवर यशस्वी कामगिरी करत आहे.

पांडूरंग पवार
मुख्याध्यापक, जि.प.प्राथ.शाळा पिंपरी जलसेन

### या विद्यार्थ्यांना दौऱ्याची संधी

राज्याबाहेरील भोपाळ येथील अभ्यास दौऱ्यासाठी पिंपरी जलसेन शाळेच्या स्वरदा गणेश गायकवाड व आरजू रमीज शेख यांची निवड झाली होती. तर राज्यांतर्गत अभ्यास दौऱ्यासाठी निसर्ग ओमप्रकाश देंडगे याची निवड झाली होती. तिनही विद्यार्थ्यांनी आपले अभ्यास दौरे यशस्वीरित्या पुर्ण केले.

# साधू संतांचे विचार देशाला तारतील !

## गजानन महाराज चंग यांचे प्रतिपादन




निघोज : प्रतिनिधी

**नित्य नामस्मरण करणे हीच खरी भक्ती असल्याचे सांगत भक्तीमार्ग सांगणारे साधू संतांचे विचार हेच देशाला तारतील असे प्रतिपादन ह.भ.प.गजानन महाराज चंग यांनी केले.**

श्रीराम जन्मोत्सवानिमित्त निघोज येथे आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची गजानन महाराज चंग यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता झाली. या किर्तनादरम्यान चंग महाराज यांनी उपस्थितांचे प्रबोधन केले. ९ दिवस चाललेल्या या सप्ताहामध्ये राज्यातील नामवंत किर्तनकारांनी हजेरी लावली. गेल्या ४७ वर्षांपासून सुरू असलेल्या ग्रामस्थ, हरिनाम सप्ताह समिती, मुंबईकर व कुलाबा मंडळाने आयोजित केलेल्या या सप्ताहास भाविकांचा मोठा प्रतिसाद लाभला.

यावेळी बोलताना चंग महाराज म्हणाले, डॉ.नारायण महाराज यांच्या किर्तनाचा योग भाविकांना आला नाही. त्यांच्या अनुपस्थित किर्तन करण्याचे भाग्य मला लाभले. डॉ. नारायण महाराज यांची प्रकृती ठिक नसल्याने ते किर्तनासाठी येऊ शकले नाहीत. लवकरच ते निघोजमध्ये येऊन भाविकांशी संवाद साधणार असल्याचे ते म्हणाले.

यावेळी चंग महाराज यांचा ज्ञानदेव लंके यांच्या हस्ते सत्कार कण्यात आला. सप्ताहासाठी दिलेल्या योगदानाबद्दल विविध मान्यवर तसेच ग्रामस्थांनाही यावेळी गौरविण्यात आले.

यावेळी वसंत कवाद, नामदेवराव थोरात, अमृताशेठ रसाळ, शांताराम कळसकर, रामदास वरखडे, निवृत्तीमहाराज तनपुरे, सरपंच चित्रा वराळ, उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे, सोमनाथ महाराज वरखडे, उमेश सोनवणे, रूपेश ढवण, लक्ष्मणराव साळवे, प्रकाश उचाळे, चंद्रकांत उचाळे उपस्थित होते. सोमनाथ महाराज वरखडे यांनी सुत्रसंचलन तर निवृत्ती महाराज तनपुरे यांनी आभार मानले.

### केंद्र व राज्य शासनाकडून निधी

गेली ४७ वर्षे अखंडपणे हा सप्ताह सुरू ठेऊन निघोजकरांनी भक्तीभाव जपला आहे. केंद्र तसेच राज्य शासनाच्या माध्यमातून तिर्थक्षेत्र विकासासाठी मोठया प्रमाणावर निधी देण्यात येत असून पारनेर तालुक्यात आमदार काशिनाथ दाते हे देखील विविध विकास कामांना भरघोस निधी देत आहेत.

अशोक सावंत
जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

# स्कॉलरशिप परीक्षांमध्ये तनपुरेवाडी शाळेची भरारी !

## मंथन, लक्षवेधी, नॅशनल स्कॉलशिपमध्ये यश

निघोज : प्रतिनिधी

**निघोजच्या तनपुरेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यानी मंथन, लक्षवेधी, नॅशनल स्कॉलरशिप परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन करत तनपुरेवाडी शाळेने विविध परीक्षांमध्ये भरारी घेतली आहे.**



तनपुरेवाडी शाळा ही गुणवत्तेसाठी जिल्ह्यात प्रसिध्द असून यंदाही विद्यार्थ्यांनी विविध परीक्षांमध्ये यश संपादन करून शाळेच्या नावलौकीकास साजेशी कामगिरी केली आहे. या शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाकडे लक्ष देण्यात येऊन वर्षभर विविध स्पर्धा परीक्षांचा सराव विद्यार्थ्यांकडून करून घेण्यात येतो. वर्षभर तयारी झाल्याने विद्यार्थी विविध परीक्षांमध्ये यश संपादन करतात.

यशस्वी विद्यार्थ्यांना वर्गशिक्षिका मंगल भुकन, मुख्याध्यापक बन्सी गुंड यांचे मार्गदर्शन लाभले. शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ तसेच पालकांनी यशस्वी विद्यार्थी तसेच मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले.

### यशस्वी विद्यार्थी

मंथन परीक्षा : अर्णव अंकुश सोनवणे १५० पैकी १५० गुण प्रथम, पार्थ विष्णू सोजे व आरोही संतोष तनपुरे १५० पैकी १३० व्दितीय, श्रेयश सुरेश गाडीलकर व श्रेयश शंकर मेहेर १५० पैकी १३४ तृतीय.
लक्षवेधी प्रज्ञाशोध : अर्णव अंकुश सोनवणे १५० पैकी १५० प्रथम,श्रेयश सुरेश गाडीलकर व श्रेयश शंकर मेहरे १५० पैकी १४६ व्दितीय, पार्थ विष्णू सोजरे व आरोही संतोष तनपुरे १५० पैकी १४० तृतीय.
नॅशनल स्कॉलरशिप : अर्णव अंकुश सोनवणे २०० पैकी १९४ प्रथम, श्रेयश शंकर मेहेर २०० पैकी १९० व्दितीय, श्रेयश सुरेश गाडीलकर २०० पैकी १८८ तृतीय क्रमांक.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com